Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

२९/२०२१

**विषय - कोव्हीड-१९ विषाणू संसर्ग साखळी तोडण्यासाठी (ब्रेक द चेन) प्रतिबंधात्मक आदेश**

**संदर्भ-** १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक २१ एप्रिल, २०२१, दिनांक २९ एप्रिल, २०२१.

२. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थापना १०५९/ दि.२२ एप्रिल, २०२१, जा. क्र. आस्थापना १०७३/ दि.२७ एप्रिल, २०२१, व जा. क्र. आस्थापना १०९४/ दि.०५ मे, २०२१,

३. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक १२ मे, २०२१.

४. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/२९३/२०२१ दि.२२/०५/२०२१

५. मा . शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्र.कारोना./२६२१/प्र.क्र. ३०/ मावि-१ /६५२५ दि. १४/०५/२०२१.

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ संसर्गाचा वाढत असलेला प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने तातडीने काही उपाययोजना व सुचनांचे काटेकोर पालन करण्यासाठी उपरोक्त संदर्भीय क्र. १ अन्वये दिलेले सर्व प्रतिबंधात्मक आदेश व स्पष्टीकरणांना दि. ०१ जून, २०२१ रोजी सकाळी ७.०० वा. पर्यंत उपरोक्त संदर्भीय क्र. ३ अन्वये मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यामध्ये अतिरिक्त निर्बंधांचा समावेश करणेत आलेला आहे. तसेच जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी उपरोक्त संदर्भीय क्र. ४ अन्वये कोविड-१९ संसर्ग तोडण्यासाठी (ब्रेक द चेन) प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केले आहेत.त्यानुसार खालील प्रमाणे निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ अधिविभाग व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांनी ऑनलाईन (Online) अध्यापन व अध्ययन सुरू ठेवावे. (Work from Home) त्याबाबतचा अनुपालन अहवाल विद्यापीठ कार्यालयास कळविण्यात यावा.

२. विद्यापीठ व महाविद्यालयातील सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागातील विभाग प्रमुख यांनी अधिविभाग / विभागातील अधिकारी व प्रशासकीय सेवकांपैकी **१५%** याप्रमाणे अधिकारी व प्रशासकीय सेवक आळीपाळीने **(Rotation)** कार्यालयात उपस्थित राहतील याचे नियोजन करावे. शक्य असलेस संबधितांनी Online स्वरूपात कामकाज करावे. ज्या अधिकारी व प्रशासकीय सेवकांना शासन निर्देशानुसार कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून **(Work from Home)** कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये. घरी राहून केलेल्या कामाचा अहवाल संबधितांनी विभागप्रमुखांना सादर करावा.

३. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभागांची (अभियांत्रिकी विभागाअंतर्गत येणारे विभाग, उद्यान विभाग, आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, वाहन विभाग, इ.) सेवा पुर्ण क्षमतेने सुरू राहतील.

४. ज्या अधिविभागात / विभागात एकत्रित मानधन व रोजंदारी सेवकांची सेवा अत्यावश्यक वाटते अशा रोजंदारी सेवकांची सेवा **१५%** पेक्षा जादा होणार नाही याची दक्षता घेवून संबधित सेवकांना उपस्थित राहणेबाबत अधिविभागप्रमुख / विभागप्रमुख यांनी आपल्या स्तरावर कळविण्यात यावे.

५. सदरचे आदेश दिनांक ३१ मे २०२१ पर्यत लागु राहातील तसेच उपरोक्त संदर्भीय अनुक्रमांक १ ते ५ मधील महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचे कडुन प्राप्त झालेले आदेशांचे व विद्यापीठ परिपत्रकातील सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

६. महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचेकडून वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, येथून पुढे महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचेकडून प्राप्त होणारे आदेश लागू राहतील.

**प्र. कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/** 1124

**दिनांक :-** 24 MAY 2021

**प्रति,**

**माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

२) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक

३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.